(65)

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## (पुरवठा विभाग)

क्र. 2011/पुवि/कक्ष-4/ईसी/ॲक्ट/कावी-03 4538 — दिनांक :29/10/2011.

विषय :- **अत्यावश्यक वस्तु अधिनियमातील कलम 6 अ अन्वये कार्यवाही.**
**पोलीस ठाणे औराद (शहा) गु.र.न.3012/011कलम 3,7 मधील जप्त टेम्पो क्र.MH-24-F-6499 व 14 बॅरल मधील निळे रॉकेल बाबत.**

1. The Essential Commodities Act. 1955 च्या कलम 6 (A) च्या Proviso प्रमाणे
2. शासन परिपत्रक निर्णय क्र. जीवका-1005/प्र.क्र.438/पापु-23 दिनांक 30/08/2005.

उपरोक्त प्रकरणात दिनांक 20/10/2011 राजी खालील प्रमाणे आदेश परित करण्यात आलेला आहे.

i. तहसीलदार निलंगा यांनी सदर निळे रॉकेल शासन जमा करुन शासन विहीत पध्दतीने वाटप करुन व ती रक्कम शासनास जमा करून तसा अहवाल 15 दिवसात सादर करावे.

ii. The Essential Commodities Act 1955 च्या कलम 6 (A) (C) च्या Proviso प्रमाणे सदर टेम्पोची, ज्या दिवशी सदर मुद्येमाल जप्त करण्यात आला, त्या दिवसाची किंमत, जे की, उप-प्रादेशीक परिवहन अधिकारी, लातूर (DY RTO) यांचेकडून ठरवून घेण्यात यावी, त्या किंमतीच्या सम मूल्याचा रक्कम एवढा दंड शासनजमा करुन सदर टेम्पो सोडण्याची कार्यवाही करण्यात यावी.

आपले माहितीस्तव कळविण्यात येते.

sd/-
जिल्हा पुरवठा अधिकारी
लातूर

प्रत : -
1. तहसीलदार, निलंगा.
2. सहाय्यक, निरीक्षक पोलीस ठाणे औराद (शहा.) ता. निलंगा.
3. उप-प्रादेशीक परिवहन अधिकारी, लातूर यांना वरील प्रमाणे आवश्यक त्या कार्यवाहीस्तव दिले जाते.

प्रत :- 1.ॲड.डी.आर.दद,लातूर 2. ॲड.डी.के. जाधव,लातूर याना माहीतीस्तव देण्यात येते.

प्रत:- जिल्हा विज्ञान संशोधन अधिकारी यानी निर्णयाची प्रत देवून कळविण्यात येते की, सदरचा निर्णय स्कॅन करुन वेबसाईट वर टाकण्यांत यावी.

जिल्हा पुरवठा अधिकारी
लातूर

# जिल्हाधिकारी लातूर यांचे न्यायालय

**क्र. 2011/पुवि/कक्ष-4/ईसी/ॲक्ट/कावी-03** **प्रकरण दाखल दिनांक : 29/08/2011**
**प्रकरण निकाली दिनांक : 20/10/2011.**

**वादी :-** पोलीस ठाणे औराद (शहा) ता. निलंगा व इतर
**विरुध्द**
**प्रतिवादी :-** 1. श्री विनोद मनोहर साठे वय 24 रा. लामजना ता. औसा जि. लातूर
2. श्री नंदलाल बन्सीलाल बिदादा रा. लामजना ता. औसा जि. लातूर

**विषय :-** **अत्यावश्यक वस्तु अधिनियमातील कलम 6 अ अन्वये कार्यवाही.**
1. The Essential Commodities Act. 1955 च्या कलम 6 (A) च्या Proviso प्रमाणे
2. शासन परिपत्रक निर्णय क्र. जीवका-1005/प्र.क्र.438/पापू-23 दिनांक 30/08/2005

## निर्णय

या प्रकरणात थोडक्यात हकिकत अशी की, वादी ( प्रविदनाधिकारी ) सहायक पोलीस निरिक्षक, औराद (शहा.) ता. निलंगा जि. लातूर यांनी त्यांचे पत्र क्र. 639/ दिनांक 26/08/2011 अन्वये गुन्हयातील आरोपी 1) टेम्पो क्र. **MH-24-F-6499 चे** चालक श्री विनोद मनोहर साठे वय 24 रा. लामजना ता. औसा 2) रॉकेल डिलर नंदलाल बन्सीलाल बिदादा रा. लामजना ता. औसा यांचे गोडाऊन मधुन टेम्पो क्र. **MH-24-F-6499** या वाहानाची किंमत 175000/- तसेच 14 लोखंडी बॅरेलची किंमत रू 2800/- असा एकुण 221536/- किमंतीचा मुद्देमाल माल बस्वकल्याण कडे जाताना हल्लगरा फाटा, ता. निलंगा येथे मिळून आल्याने व प्रकरणात जीवनावश्यक वस्तु अधिनियम अंतर्गत कार्यवाही होणेबाबत वादी ( प्रविदनाधिकारी ) सहायक पोलीस निरिक्षक, औराद (शहा.) यांनी विनंती केली आहे.

त्याअनुषंगाने प्रस्तुत प्रकरणात वादी व प्रतिवादी यांना जीवनावश्यक वस्तू कायद्या मधील कलम 6(ब) नुसार या कार्यालयाचे नोटीस क्र. 2011/पुरवठा/कक्ष-4/ईसी-ॲक्ट/कावी 03 दिनांक 03/09/2011 अन्वये वादी व प्रतिवादी क्र. 1 व 2 यांना नोटीस काढून सुनावणी दिनांक 12/09/2011 रोजी 11.00 वा सुनावणी ठेवली होती.

त्यानुसार दिनांक 12/09/2011 रोजी 11.30 वा सुनावणीस प्रतिवादी क्र. 2 श्री नंदलाल बन्सीलाल बिदादा यांचे विधीज्ञ ॲड. डी.आर.दड यांनी हजर राहून म्हणणे सादर केले की, प्रकरणातील जप्तटेम्पो मधील 14 बॅरल मधील 2800 लिटर रॉकेल याचा त्यांचेशी संबंध नसून जानीवपुर्वक कट करून एफआयआर दाखल केले आहे. तथापी सदर एफआयआर मधून त्यांचे नाव वगळण्यासाठी प्रकरण प्रलंबीत असल्याचे त्यांनी दिनांक 12/09/2011 रोजी लेखी खुलासा सादर कला आहे.

प्रतिवादी क्र. 1 यांचे विधीज्ञ हजर होते. प्रतिवादी यांचे वडील यांनी अर्ज सादर करुन प्रकरणात वेळ वाढवून देण्याची विनंती केली. त्यानुसार त्यांची विनंती मान्य करुन प्रकरणात या कार्यालयाची सम क्रमांक नोटीस दिनांक 13/10/2011 अन्वये वादी व प्रतिवादी क्र.1 व 2 यांना प्रकरणात दिनांक 20/10/2011 रोजी 12.00 वा सुनावणी ठेवल्या बाबत कळविले होते.

सदर प्रकरणात दिनांक 20/10/2011 रोजी सुनावणी वेळी प्रतिवादी क्र. 2 रॉकेल अर्धघाऊक परवानाधारक श्री नंदलाल बिदादा हजर झाले नाही. प्रतिवादी क्र 1 टेम्पो मालक श्री मनोहर सुर्यभान साठे मौ. लामजना यांचे वतीने विधीज्ञ ॲड डी.के. जाधव हजर झाले. त्यांनी युक्तीवाद केला की, सदर निळे रॉकेल अर्धघाऊक मे. व्यंकटेश ट्रेडींग कंपनी पानगाव ता. रेणापूर यांचेकडील असून ते सदर टेम्पो मध्ये 14 बॅरल मध्ये भरुन मौ. खरोळा व मौ. कारेपूर ता. रेणापूर येथील किरकोळ केरोसीन परवानाधारक यांच्याकडे नेहण्यात येत होते. म्हणून सदर निळे रॉकेल काळयाबाजारात नेले नसून ते सार्वजनिक वितरणासाठीचे होते. म्हणून सदर टेम्पो अवैध वाहतुक करत नव्हता व सदर टेम्पो सोडण्यात यावा असा युक्तीवाद केला.

**P.T.O**

ज्यावेळेस श्री जाधव यांना विचारण्यात आले की, सदर टेम्पो हल्लगरा फाटा, ता. निलंगा येथे कसा पोहचला, तर त्यांनी सांगीतले की, ड्रायव्हर च्या शपथपत्राप्रमाणे कांही लोकांनी दमदाटी करुन सदर टेम्पो ता. निलंगा कडे नेला. सदर युक्तीवाद सुसंगत वाटत नाही. जेंव्हा श्री जाधव यांना विचारण्यात आले की, ड्रायव्हरने सदर लोकांविरुध्द कांही फिर्याद पोलीस ठाण्यात दिली आहे काय? तर त्यांनी उत्तर दिले की, कुठल्याही प्रकारची फिर्याद देण्यात आलेली नाही. म्हणून ड्रायव्हरने सादर केलेले शपथपत्रावर विश्वास करणे युक्तीसंगत वाटत नाही.

प्रकरणात जप्त रॉकेल व. टेम्पो क्र. MH-24-F-6499 चे माल विरुध्द EC Act चे कलम 3 व 7 खाली मा. न्यायालयात प्रकरण सुरु आहे. त्या ठिकाणी निकाल लागण्यास बराच अवधी लागणार आहे. तरी वर नमुद विवेचन व फौजदारी गुन्हा प्रकरणी संबंधीत न्यायालयात जो निर्णय होईल त्यास अधिन राहून मी जिल्हाधिकारी लातूर मला शासन परिपत्रक दिनांक 30/08/2005 नुसार व जीवनावश्यक वस्तु कायद्याचे कलम 6 अ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारानुसार पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

i. तहसीलदार निलंगा यांनी सदर निळे रॉकेल शासन जमा करुन शासन विहीत पध्दतीने वाटप करुन व ती रक्कम शासनास जमा करून तसा अहवाल 15 दिवसात सादर करावे.

ii. The Essential Commodities Act 1955 च्या कलम 6 (A) (C) च्या Proviso प्रमाणे सदर टेम्पोची, ज्या दिवशी सदर मुद्येमाल जप्त करण्यात आला, त्या दिवसाची किंमत, जे की, उप-प्रादेशीक परिवहन अधिकारी, लातूर (DY RTO) यांचेकडून ठरवून घेण्यात यावी, त्या किंमतीच्या सम मुल्याची रक्कम एवढा दंड शासनजमा करुन सदर टेम्पो सोडण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सर्व संबंधीतास कळवून संचिका बंद करून अभिलेख कक्षात वर्ग करावी.

20-10-11

**जिल्हाधिकारी, लातूर.**